ानिक
ा विषारद
६ ते ९
खडा,
र,
ौषधोपचार
माता नगरसमोर,
6809

# संचार

• Solapur • Sunday, October 27, 2024 • सोलापूर • रविवार, २७ ऑक्टोबर २०२४ www.esanchar.co.in

संचार



## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप प्रादेशिक कार्यालय :- ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हील लाईन्स,
शासकीय दूध डेअरी समोर, सात रस्ता, सोलापूर-४१३००३
Email : srosolapur@mpcb.gov.in

### पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी बाबत सूचना

मे. भिमा सहकारी साखर कारखाना लि. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांचा प्रस्तावित विस्तारीकरण ऊस गाळप क्षमता ५००० मे. टन प्रति दिन वरून ८००० मे. टन प्रति दिन तसेच ३ मेगावॅटचा वीजनिर्मिती प्रकल्पाची आणि मोलॅसिस (बी व सी)/केन सिरप वर आधारित २०० केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्पाची स्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

या प्रस्तावासंबंधी प्रकल्पाच्या संभाव्य प्रकल्प पिडित नागरिक / शेतकरी / पर्यावरणाविषयी काम करणाऱ्या संस्था यांच्याकडून पर्यावरण विषयक सूचना, विचार, टीका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी पर्यावरणविषयक जाहीर सुनावणीचे आयोजन करण्यात येत आहे. केंद्रीय पर्यावरण व वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांनी जारी केलेल्या आदेशान्वये पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी अधिसुचनेत अधिकतम लोकांना परवानगी देण्यात येत आहे.

**सुनावणीचे ठिकाण :** मे. भिमा सहकारी साखर कारखाना लि. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर

**सुनावणीची तारीख :** गुरूवार, दिनांक २८/११/२०२४.

**सुनावणीची वेळ :** दुपारी १२.०० वाजता

सदर विस्तारीकरण प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणाविषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित किंवा प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना जाहीर सुनावणीमध्ये सहभाग घेता येईल. प्रस्तावित प्रकल्पासंबंधी सूचना, मत, टीका-टिप्पणी किंवा आक्षेप, तोंडी किंवा लेखी स्वरुपात दि. २८/११/२०२४ पर्यंत नोंदविता येतील.

सदर प्रकल्पासंबंधीचा संक्षिप्त अहवाल, पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवाल इत्यादी संबंधी माहिती असलेले दस्तऐवज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध असून संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये जाऊन सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, सोलापूर.
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर.
४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय) कल्पतरु पॉईन्ट, ३ रा व ४ था मजला, सायन माटुंगा, स्किम रोड क्र. ८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
५. प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, जोग सेंटर, ३रा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रोड, पुणे ४११००३.
६. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर.
८. तहसीलदार, तहसील कार्यालय मोहोळ, ता. मोहोळ, जिल्हा सोलापूर.
९. गटविकास अधिकारी, पंचायत समिती मोहोळ, जिल्हा-सोलापूर.
१०. तहसीलदार, तहसील कार्यालय पंढरपूर, ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर.
११. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा-सोलापूर.
१२. मौजे-वरकुटे, शेजबाभुळगांव, पाटकुल, टाकळी सिकंदर, सौंदणे, औंधी, अधेगांव, पेनूर, कोथळे, अंकोली या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, ता. मोहोळ, मौजे तारापूर, फुलचिंचोली, पुळुज, पोहरगांव, आंबेचिंचोळी, मगरवाडी या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, ता. पंढरपूर, जि. सोलापूर.

सही/-
(निखिल मोरे)
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर